## भारतीय तरुणांना इंग्रजांचे 'चले जाव'

काही दिवसांपूर्वी एक बातमी होती. परदेशात गेलेल्या जवळपास २५००० तरुणांनी आम्हाला आमच्या देशात परत जायचे आहे, असा अर्ज अमेरिकन सरकारकडे केला होता. त्यांना वाटतंय् की भारतातच आता बुम आला आहे. मग वतन की मिट्टी सोडून बाहेर का राह्यचे?
त्यांचे परत येण्यामागचे नेमके कारण आताच सांगता यायचे नाही पण आता इंग्लंड वरुन दुसरी बातमी आहे. टोनी ब्लेअरचे सरकार आता इंग्लंड मधील जवळपास ३०,००० भारतीय नागरिकांना परत पाठविण्याची तयारी करीत आहे. नव्हे, तसे आदेशच या भारतीयांना देण्यात आले आहेत. 'तुम्ही तुमची स्थावर- जंगम मालत्ता गुंडाळा, तुमची मुलं शाळेत शिकत असतील तर त्यांनाही परत नेण्याची तयारी करा अन् चालते व्हा!' असेच या लोकांना सांगण्यात आले आहे. त्या विरोधात आता हे लोक लेब पार्टीच्या सरकारशी लढण्याच्या तयारीत आहेत. त्यांना तिथेही पाठिंबा मिळतो आहे. काय व्हायचं ते होइल पण आता जी वेळ ब्रिटनमध्ये आली आहे तीच उद्या सिलिकॉन व्हॅलीतही येणार. तीच उद्या बिपीओ, कॉलसेनटर्सच्या क्षेत्रातही येणार. इंग्रजांची ही नीती राहिली आहे, 'युझ अँड थ्रो' थोडक्यात काय तर ज्या तीस हजारांच्या बुडावर लात मारण्याची तयारी तेथील सरकारने केली आहे त्यांचा उपयोग संपला आहे.
काही वर्षांपूर्वी तिथल्या सरकारला त्यांचा विकासाचा गाडा चालविण्यासाठी कुशल तंत्रज्ञ हवे होते. त्यांच्या देशात इतके अतिकुशल लोक नव्हते मग त्यांनी 'हायली स्कील्ड मायग्रंट प्रोग्राम' तयार केला. त्या अंतर्गत कॉमनवेल्थ (माजी गुलाम) देशातील अशा लोकांना आवाहन करण्यात आले. या योजनेंतर्गत त्यांना तिकडे नेण्यात आले. इंग्रजांच्या विकासाचा गाडा धावला. काय आहे भारतीय लोक हुशार आहेतच पण मेहनती देखील आहेत. त्यांचे इंग्रजी भाषेवर देखील प्रभुत्व आहे. रोजगाराच्या संधीच्या शोधात ते असतात. मोठे पद, मोठा पगार अन् इंग्रजीचे- युरोपचे आकर्षण यामुळे अनेकजण तिकडे गेले. त्यात त्यांची काही चूक नाही. भारतीय राज्यकर्त्यांची नालायकी मात्र आहे. नियोजन नसल्याने अनेक प्रज्ञावंत अमेरिकेत जाऊ इच्छीतात. आता तर मध्यमवर्गीय- उच्चमध्यमवर्गीय ते नवश्रीमंत सुशिक्षित समाजात तर 'आमचं कुणीतरी अमेरिकेत आहे.' हा स्टेटस् सिंबॉल झाला आहे. आपला पाल्य दहावी झाला की त्याने अमेरिकेच्या विमानात आपले सीट बुक करण्याच्या मागेच लागावे, अशी पालकांची इच्छा असते.
इंग्रजांनी आमल्या देशावर दीडशे वर्षे राज्य केले तरीही आम्ही त्यांना ओळखण्यात नेमके चुकतो. बहुराष्ट्रीय कंपन्या केवळ नफ्यासाठीच काम करतात. वसाहतवादी देश कुणाच्या भल्यासाठी काम करीत नाहीत. हे आम्हाला कळत नाही नि मग असे हाकलण्यात येते. तिकडे गेलेले भारतीय श्रीमंत आहेत. कारण ते मेहनती आहेत. ते समाजात चांगले मिसळतात. आयटी, वैद्यक, राजकारण, संस्कृती, कला या क्षेत्रातही ते आघाडीवर आहेत. इंद्रा नुई पेप्सीको ची प्रमुख झाली. तेथील अनेक इस्पितळांचे प्रमुख भारतीय आहेत. काय आहे की तंत्रज्ञ निर्माण करता येतील. पण अढळपद मिळविणारे कौशल्यवान निर्माण करता येत नाहीत. डॉक्टर्स तयार करता येतील पण सर्जन तयार करता येत नाही. पत्रकार तयार करता येत नाहीत. सद्दामच्या फाशीचे वृत्त प्रसारित करणारे वाहिन्यांचे पत्रकार भारतीय होते... सांगायचं हेच की असं अढळपद, धृवपद मिळविता आलं नाही तर अशी लात बसते. सध्या तरुणाईत ट्रेंड आहे. इंजिनियर इलेक्ट्रानिक्स किंवा मेकॅ निकलमध्ये व्हायचं. एकतर सॉफ्टवेअरमध्ये नंतर अभ्यासक्रम करायचा किंवा पैसा खर्च करून एमबीए करायचं अन् युरोपात पळायचं. हा बुम कुठवर टिकणार? सध्या ठीक आहे एक कंपनी सोडली किंवा काढलं तर दुसऱ्या सॉफ्टवेअर कंपनीत काम मिळतं पण हा बुम संपला की काय? अगदी दहाच वर्षांपूर्वी १९९०-९५ ला डॉट कॉम बुम होता. अवघ्या पाच वर्षात तो संपला. नेमके हेच आता इंग्लंडला झाले आहे. तिकडे डॉक्टर, इंजिनियर हवे होते तेव्हा त्यांना नेण्यात आलं. आकर्षक आवाहनं देण्यात आली. आता गरज संपली आहे. युरोपीयन देशातून आता तंत्रज्ञ भेटू लागल्याचे या प्रकल्पाचे मंत्री डॅमियन ग्रीन सांगतात. त्यांच्याकडे अशी 'स्कील्ड' माणसे नव्हती अन् आता आहेत... म्हणजे काय? ते आपल्याला वापरतच आले आहेत. भारतावर सत्ता असताना त्यांना त्यांचा राजगाडा चालविण्यासाठी येथील बाशिंदे हवे होते. बाबू लोक हवे होते म्हणून त्यांनी मेकॉलेची शिक्षण पद्धती राबविली अन् राबणारे कारकून निर्माण केले. तेव्हाचे प्रज्ञावंत मात्र त्याला फसले नाहीत. टिळक, गांधीजी, सुभाषबाबू, जवाहरलाल नेहरू, डॉ. आंबेकर ही मंडळी स्वातंत्र्य लढ्यात उतरली. दुसऱ्या महायुद्धानंतर इंग्रजांचे सामर्थ्य खिळखिळे झाले. अनेक पातळ्यांवर त्यांना लढावे लागले. त्यांच्या वसाहती देखील संपल्या. पंडित जवाहरलाल नेहरूंनी ओळखले की आपला देश चालवायला इंजिनियर्स, डॉक्टर्स, व्यवस्थापनातील लोक, शास्त्रज्ञ लागतील. त्यांनी तशा संधी निर्माण केल्या. आयआयटी, व्यवस्थापन शास्त्राच्या संस्था, मेडिकल कॉलेजेस त्यांनी सुरू केली. इंग्रजांना हा वेळ मिळाला नाही पण त्यांनी ही 'हायली स्कील्ड इंडियन्स'ना पळविण्याची स्कीम काढली. नंतर त्यांच्या लक्षात आले की भारतीय हे वर्चस्व ठेवणारे आहेत. क्रिकेट असो की व्यवस्थापन, राजकारण असो की कला- संस्कृती साऱ्यातच ते आघाडीवर आहेत. त्यांचे हे वर्चस्व इंग्रजांना कसे सोसवणार?

मधल्या काळात त्यांच्या म्हणण्यानुसार आता त्यांच्या विद्यापीठातूनच अनेक हायली स्कील्ड बाहेर पडत आहेत. खरेतर त्यांच्याकडेच आता रोजगार हा प्रश्न निर्माण झाला आहे. या इमीग्रंट्सना बाहेर काढल्या शिवाय तो सुटणार नाही.
भारत सरकारने यात लक्ष घातले पाहिजे. देशात शिकून इंग्रजांच्या भाकऱ्या भाजण्याची प्रवृत्ती देखील भारतीय तरुणांनी सोडली पाहिजे. 'आम्ही यांच्या देशाच्या प्रगतीसाठी झटलो. आमचा देश सोडला, आमची माती सोडली अन् आता हे जा म्हणताहेत.' अशी केविलवाणी ओरड करण्यापेक्षा आपल्या देशासाठी तेच सारे करण्याची तयारी ठेवायला हवी. बाबू होण्यापेक्षा हे बरे आहे. निघायचेच असेल तर आपण अमृताचे पुत्र आहोत, याचे भान ठेवून दिग्विजयासाठीच निघा. एकेकाळी आपण इंग्रजांना 'चले जाव' म्हणालो होतो आता ते आपल्याला म्हणताहेत. पण या म्हणण्यात फरक आहे. ते त्यांची गरज संपली म्हणून हाकलत आहेत आम्ही सहनशक्ती संपली होती म्हणून हाकलले होते...
श्याम पेठकर